REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 9 | JUNE - 2018

# भारतातील अनुसुचीत जातीची लोकसंख्या

प्रा. डॉ. महेंद्र गजधाने
के.बी.पी. कॉलेज, पंढरपूर.

## प्रस्तावना :



'भारत सरकार कायदा 1935' नुसार पहिल्यांदा सामाजिकदृष्टया वंचित अस्पृशांना 'अनुसूचित जाती' म्हणून अधिसुचित करण्यात आले व त्यानूसार अशा जातींची एक सुची 'भारत सरकार (अनुसुचित जाती) आदेश 1936' मध्ये अधिसूचित करण्यात आली. त्यामध्ये मद्रास, मुंबई, बंगाल, संयुक्त प्रांत, पंजाब, बिहार, मध्यप्रदेश व वऱ्हाड, आसाम, ओरिसा या 09 प्रांतातील 429 जातीचा समावेश अनुसूचित जातीमध्ये करण्यात आला.

26 जानेवारी 1950 रोजी अस्तित्वात आलेल्या राज्यघटनेनुसार एखादे जातीचे निर्देशन अनुसूचित जाती म्हणून करण्याची तरतूद घटनेच्या कलम 341 मध्ये दिलेले आहे. त्यानुसार कोणत्या जातींचा समावेश अनुसूचित जातीमध्ये करायचा याचा अधिकार राष्ट्रपतीला देण्यात आला आहे. राष्ट्रपती संबंधित राज्य किंवा केंद्रेशासित प्रदेशातील राज्यपालांशी चर्चा करुन विविध निकषांव्दारे हा निर्णय घेतात. त्यासाठी संसदेमध्ये कायदाही संमत करावा लागातो.

1950 ला घटनेने भारतातील 29 राज्यात 1108 अनुसूचित जाती जाहिर केले. सध्या भारतात 28 राज्य व 07 केंद्रशासीत प्रदेशांमध्ये एकूण 1208 जाती अनुसूचित जाती म्हणून घोषित करण्यात आले आहे. अनुसूचित जातीची सर्वाधिक संख्या कर्नाटकात (101). त्या खालोखाल ओरिसा (93) व तामिळनाडू (76) अशी जाहीर करण्यात आली आहे. अरुणाचल प्रदेश व नागालॅड राज्यांमध्ये तसेच अंदमान व निकोबार बेटे आणि लक्षव्दिप या केंद्रशासीत प्रदेशामध्ये कोणत्याही जातीस अनुसूचित जाती म्हणून घोषित करण्यात आले नाही.

## डद्दिष्टे –

1. भारतातील अनुसूचित जातीच्या लोकसंख्येचा आढावा घेणे.
2. भारतातील अनुसूचित जातीच्या लोकसंख्येमध्ये आलेला बदल अभ्यासणे

## अनुसूचित जाती मधील लोकसंख्या वाढीचा कल –

देशातील हिंदू, शीख व बौध्द धर्मातील अनुसूचित जातीच्या लोकांचा समावेश देशातील एकूण अनुसूचित जातीच्या लोकसंख्येत केला जातो. इतर धर्मातील अशा लोकांना अनूसूचित जातीचा दर्जा दिला जात नाही. देशातील एकूण लोकसंख्येतील अनुसूचित जातीची टक्केवारी आणि प्रत्येक दशकातील अनुसूचित जातीच्या लोकसंख्या वाढीचा कल कोष्टका मध्ये दर्शविण्यात आला आहे.

कोष्टक

भारतातील अनुसूचित जाती मधील लोकसंख्या वाढीचा कल

| जनगणना वर्ष | देशाची लोकसंख्या (कोटी) | अनुसूचित जातीची लोकसंख्या (कोटी) | टक्के बदल | अनुसूचित जातीचे एकूण लोकसंख्येशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| 1951 | 361088000 | 55463116 | — | 15.36 |
| 1961 | 439235000 | 65467545 | 16.42 | 14.07 |
| 1971 | 548189652 | 8003136 | 23.95 | 14.60 |
| 1981 | 683329097 | 102499350 | 28.07 | 15.00 |
| 1991 | 846402039 | 138215142 | 34.84 | 16.33 |
| 2001 | 1028737436 | 166655464 | 20.58 | 16.20 |
| 2011 | 1210193422 | 201378372 | 20.84 | 16.64 |

स्त्रोत — भारतीय जनगणना अहवाल

कोष्टका मध्ये दर्शविल्याप्रमाणे, 2001 च्या जनगणनेचा अपवाद वगळता 2011 च्या जनगणनेपासून देशातील एकूण लोकसंख्येमधील अनुसूचित जातीचे प्रमाण व प्रत्येक दशकातील अनुसूचित जातीच्या लोकसंख्या वाढीच्या दरात वाढ घडून आल्याचे दिसून येते.

2011 च्या जनगणनेनूसार भारतातील अनुसूचित जातीची एकूण लोकसंख्या 20378372 असून ती भारताच्या एकूण लोकसंख्येच्या 16.64 टक्के आहे. एकूण लोकसंख्येमध्ये 51.41 टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात तर 48.59 टक्के लोकसंख्या शहरी भागात राहते. देशातील एकूण अनुसूचित जीतीच्या लोकसंख्येमध्ये सर्वाधिक 41357608 (20.54 टक्के) लोकसंख्या उत्तर प्रदेशाची असून त्याखालोखाल पं.बंगाल, 21463270 (10.66 टक्के), बिहार 16567325 (8.25 टक्के), तामिळनाडू 14438445 (7.17 टक्के), आंध्रप्रदेश 13878078 (6.89 टक्के) या राज्यांचा क्रमांक लागतो. उत्तर प्रदेश, पं.बंगाल, बिहार, तामिळनाडू, आंध्रप्रदेष, महाराष्ट्र, मध्यप्रदेष, राजस्थान, कर्नाटक, पंजाब, ओरिसा, हरियाणा व गुजरात या तेरा राज्यात भारतातील 180256233 (89.51 टक्के) अनुसूचित जातीची लोकसंख्या राहते. झारखंड, छत्तीसगड, केरळ, दिल्ली व आसाम मध्ये दोन टक्के पेक्षा कमी आणि इतर राज्य व केंद्रशासीत प्रदेषात एक टक्के पेक्षा कमी लोकसंख्या असल्याचे दिसून येते. अरुणाचल प्रदेश व नागालॅड राज्यात तसेच लक्षव्दिप व अंदमान, निकोबार बेटे या केंद्रशासीत प्रदेशात अनुसूचित जातीची लोकसंख्या शून्य आहे. प्रत्येक राज्यातील एकूण लोकसंख्येमध्ये त्या राज्याच्या अनुसूचित जातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणाचा विचार केल्यास असे दिसून येते की, पंजाब राज्यातील अनुसुचित जातीच्या लोकसंख्येचे प्रमाण सर्वाधिक (39.9 टक्के) असनू त्याखालोखाल हिमाचल प्रदेश (25.2 टक्के) व प. बंगाल (23.5 टक्के) या राज्यांचा क्रमांक लागतो. भारताच्या उत्तर व दक्षिण भागात अनुसूचित जातीच्या लोकांचे केंद्रिकरण झाल्याचे दिसून येते. तर ईशान्य डोंगरी भागात अनुसूचित जातीचे प्रमाण अत्यल्प असल्याचे दिसून येते. भारतातील अनुसूचित जातीमधील स्त्रि–पुरुष प्रमाण 945 इतके असून ते भारतातील सर्वसाधारण स्त्रि–पुरुष प्रमाणापेक्षा अधिक (940) आहे. अनुसूचित जातीमधील सर्वाधिक स्त्रि–पुरुष प्रमाण केरळ (1057) राज्यात असून त्याखालोखाल पॉडेचरी (1056), आंध्रप्रदेश (1008) आणि तामिळनाडू (1004) या केंद्रशासित प्रदेश व राज्यांचा क्रमांक लागतो. भारतातील अनुसूचित जातीमधील साक्षरतेचे प्रमाण 66.07 टक्के असून ते 2001 ला 54.67 टक्के, 1991 ला 30.06 टक्के आणि 1981 ला 16.07 टक्के इतके कमी होते. अलिकडे अनुसूचित जातीच्या साक्षरतेच्या प्रमाणात मोठी वाढ झालेली असली तरी ती भारतातील सर्वसाधारण साक्षरता प्रमाणापेक्षा कमी (84.7 टक्के) असल्याचे दिसून येते.

संदर्भ —

1) जनगणना अहवाल